नि.दि.दा. क्र.२४७/२०१२
नि.क्र.४७.

**प्रतिवादीतर्फे उलटतपास विद्वान वकील श्री. एम.आय पठाण यांचेमार्फतः–**

८. वादी क्र.१ माझे वडिल प्रताप हे मयत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे मयत वडिल प्रताप यांना ताराबाई व विठाबाई अशा दोन बायका होत्या. हे म्हणणे खरे आहे की, विठाबाई हिने आमचे विरुध्द रे.मु.नं.३९०/२०१२ हा नेवासा न्यायालयात दाखल केला आहे. तो प्रलंबित आहे. त्या दाव्यात आम्ही कैफियत दिलेली आहे. वादी क्र.३ गौरी ही माझी बहिण आहे. वादी क्र.४ संभाजी हा माझा भाऊ आहे. मला रेणुका नावाची अजुन एक बहिण आहे, ती संगमनेर येथे राहते. वादी क्र.२ ते ४, मी व रेणुका असे एकत्र कुटुंबाचे सदस्य आहोत. वादी क्र.२ ते ४ यांनी माझ्या हक्कात सदर दावा चालवणे कामी कुलमुकत्यारपत्र दिलेले आहे. ते मी केसमध्ये दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुळ कुलमुकत्यारपत्र केसमध्ये दाखल केलेले नाही. मी मुळ कुलमुकत्यारपत्र केसमध्ये दाखल करीन.

९. दावा मिळकत ग्रामपंचायत घर क्र.२९८–अ चे दक्षिणोत्तर २०.३ फुट व पुर्व पश्चिम १७ फुट ऐवढे क्षेत्रफळ आहे. दावा मिळकतीचा सिटी सर्वे नंबर १४८६ असा आहे. त्याचे क्षेत्रफळ मला आठवत नाही. सिटी सर्वे नंबर १४८७ चा ग्रामपंचायत क्रमांक मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे नंबर १४८६ व १४८७ ला एकच ग्रामपंचायत क्रमांक पडलेला आहे. दावा मिळकत २५८–अ च्या चतुःसिमा मला आठवत नाहीत. सिटी सर्वे नंबर १४८६ च्या चतुःसिमा मला आठवत नाहीत. सिटी सर्वे नंबर १४८७ च्या चतुःसिमा मला आठवत नाहीत. मला दाव्याबाबतची संपुर्ण माहिती आहे. मी शपथपत्र देण्यापुर्वी दावा वाचून पाहिला होता. दाव्यातील परिच्छेद क्र.१ मधील मजकुर बरोबर आहे. ग्रामपंचायत मिळकत क्र.२५८/क चे मालक श्री गणपत चौधरी हे आहेत. गणपत चौधरी

यांना तीन भाऊ आहेत. हे मला आठवत नाही की, गणपत चौधरी यांच्या भावांचा सदर मिळकतीशी काही संबंध आहे का.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2024.11.27 14:55:17 +0530

दिनांक – २७/११/२०२४

**(एस.एन. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
नेवासा.